महाराष्ट्र शासन

# शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य,

मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१.

## जाहीर प्रकटन,

### इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२६-२७

शैक्षणिक सत्र २०२६-२७ मधील इयत्ता ११ वी केंद्रिय ऑनलाईन प्रवेश सुरु करण्यात आली आहे. दिनांक २२/०५/२०२६ रोजी पर्यंत एकूण ११३६६५० विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी नोंदणी केली आहे.

दिनांक २१/०५/२०२६ रोजी पासून नियमित फेरी १ ची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. या फेरीमध्ये विद्यार्थी नोंदणी करीता दिनांक २१/०५/२०२६ ते २३/०५/२०२६ पर्यंत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. त्यामध्ये बदल करुन दिनांक २५/०५/२०२६ रोजी सायंकाळी ०६.०० वा. पर्यंत वाढवून देण्यात येत आहे. सदर फेरीचे सुधारीत वेळापत्रक सोबत संलग्न.

विद्यार्थी/पालक तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी याची नोंद घ्यावी. या बाबीची व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी. ही विनंती.

**अधिकृत पोर्टल**-https://mahafyjcadmissions.in

**ई-मेल आयडी** — support@mahafyjcadmissions.in

**हेल्पलाईन नंबर - ८५३०९५५५६४.**

(डॉ. महेश पालकर)
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे

**स्थळः** पुणे
**दिनांकः** २२ मे, २०२६

शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रकिया सन २०२६-२७

नियमित कॅप फेरी १

सुधारीत वेळापत्रक

| अ.क्र. | CAP प्रवेश कार्यवाही व सर्वसाधारण बाबी | कालावधी | Quota प्रवेश कार्यवाही व सर्वसाधारण बाबी | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १. | • नविन विद्यार्थ्यांची नोंदणी आणि भाग-१ मधील बदल<br>• विद्यार्थी पसंतीक्रम अर्ज भाग-२ भरणे<br>• विद्यार्थी किमान १ आणि जास्तीत जास्त १० कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरणे.<br>• विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीक्रम, गुण आणि अर्जामध्ये दिलेल्या लागू आरक्षणानुसार (असल्यास) कनिष्ठ महाविद्यालय दिले जातील. | २१ मे २०२६ सकाळी ०८.००<br>ते<br>२५ मे २०२६ सायंकाळी ०६.०० वा. पर्यंत | • प्रवेशासाठी नविन विद्यार्थी नोंदणी भाग-१ मध्ये दुरस्ती करणे<br>• विद्यार्थ्यांनी कोटा प्रवेशासाठी (व्यवस्थापन कोटा, संस्था अंतर्गत प्रवेश कोटा व अल्पसंख्याक कोटा) पंसतीक्रम ऑनलाईन नोंदविणे व लॉक करणे.<br>• (नियमित फेरी-१ मध्ये कोट्यांतर्गत प्रवेशासाठी कोटा पसंती अर्ज पुन्हा लॉक करणे आवश्यक आहे.) | प्रवेश अर्ज |
| २. | अलॉटमेंट प्रोसेस | २६ मे, २०२६ ते २८ मे २०२६ | अलॉटमेंट प्रोसस | अलॉटमेंट प्रोसेस |
| ३. | • वाटप प्रक्रिया (अलॉटमेंट प्रोसेस) (कॅप फेरी-१)<br>• पोर्टलवर फेरीसाठी कनिष्ठ महाविद्यालय वाटप यादी प्रदर्शित करणे.<br>• विद्यार्थ्यांच्या लॉगिनमध्ये प्रवेशासाठी वाटप केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांचा तपशिल प्रदर्शित करणे.<br>• कनिष्ठ महाविद्यालयांना वाटप केलेल्या विद्यार्थ्यांची यादी प्रदर्शित करणे.<br>• प्रवेश फेरीसाठी कटऑफ यादी प्रदर्शित करणे. (पोर्टलवर प्रसिध्द केले जाईल.)<br>• विद्यार्थ्यांना SMS व्दारे संदेश पाठविणे. | २९ मे २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. | • कोट्यांतर्गत अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यालयांच्या लॉगिन मध्ये दर्शविणे (इन-हाऊस, व्यवस्थापन, अल्पसंख्याक कोटा)<br>• विद्यालयांनी प्रवेशासाठी कोटा गुणवत्ता यादी/निवड यादी दर्शनी भागात प्रसिध्द करणे. | यादी प्रसिध्द करणे |
| ४. | • वाटप केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयास सहमत असल्यास विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी पुढे जा (**proceed for admission**)<br>• कागदपत्र पडताळणीसाठी वाटप केलेल्या महाविद्यालयात उपस्थित राहणे आणि विहित शुल्क भरणे इत्यादी. विद्यार्थ्यांना वाटप केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश निश्चित करणे.<br>• महाविद्यालय लॉगिनवर प्रवेशाची पुष्टी, नकार आणि प्रवेश रद्द करणे. | २९ मे, २०२६ सकाळी १२.००<br>ते<br>०३ जून २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वा. पर्यंत | • विद्यालयांनी प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांना संपर्क करणे (विद्यालयांनी कोट्यांतर्गत प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना त्यांची निवड झाल्याबाबत व या कालावधीत प्रवेश घेण्यासाठी येण्याबाबत कळविण्यात यावे.)<br>• विद्यार्थ्यांनी कोट्यांतर्गत प्रवेश निश्चित करणे (संबंधित कोट्यांतर्गत प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करणे.)<br>• विद्यालयांनी पात्र विद्यार्थ्यांचे कोट्यांतर्गत प्रवेश निश्चित करणे (विद्यालयांनी आपल्या विद्यालयात कोट्यांतर्गत प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना आवश्यक संपूर्ण पडताळणी व कागदपत्रांची पडताळणी करुन विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करावे.) | प्रवेश |
| ५. | कनिष्ठ महाविद्यालय संबंधित कामकाज | ०४ जून २०२६ | कनिष्ठ महाविद्यालय संबंधित कामकाज | - |
| ६. | • डेटा प्रोसेस<br>• दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर करणे | ०५ जून २०२६<br>०५ जून २०२६ रोजी सायंकाळी ०६.०० वा. | • डेटा प्रोसेस<br>• दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर करणे | - |
| | • रिक्त जागा प्रदर्शित करणे | ०६ जून २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. | • रिक्त जागा प्रदर्शित करणे | रिक्त जागा प्रदर्शित करणे |

टीप- वरील वेळापत्रकानुसार प्रत्येक कार्यवाही शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व विद्यार्थ्यांनी वेळेत पूर्ण करावी.

(डॉ. महेश पालकर)
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे

स्थळ: पुणे
दिनांक: २२ मे, २०२६